# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग, प्रभादेवी रेल्वेस्टेशन जवळ , मुंबई-१३.
दूरध्वनी क्र.०२२-६९३२८११७ ईमेल: mlwbprog@gmail.com

जा.क्र.मका/कार्यक्रम/२०२५/ ७८०

दिनांक: ०८/११/२०२५

परिपत्रक :-

विषय :- १७ वे राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबीर २०२५-२६

संदर्भ :- १)मका/कार्यक्रम/२०२३/६७९ दिनांक ३०.०९.२०२३
२)मका/कार्यक्रम/२०२५/६७१ दिनांक १५.०७.२०२५
३)विकानाशिक/कार्यक्रम/२०२५/१५९८ दिनांक १७.०९.२०२५

## उद्देश व स्वरूप

कामगार व कामगार कुटुंबीयांना भजनाच्या विविध प्रकारांची माहिती व्हावी तसेच गायन, वादन याबाबत शास्त्रोक्त गोष्टींचे आकलन व्हावे व भजनातून समाज प्रबोधन कसे करावे याची माहिती व्हावी या दृष्टीने मंडळाच्या वतीने कामगार भजन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन राज्यात दरवर्षी एका ठिकाणी करण्यात येते. आजमिती पर्यंत एकूण १६ भजन प्रशिक्षण शिबीर संपन्न झाले आहेत.

## प्रस्तावना

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील मंडळाचे १७ वे राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबीर दिनांक १२ ते १४ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत नाशिक विभागात **" श्री समर्थ सदगुरु किसनगिरी बाबा सेवकाश्रम, देवगड, ता.नेवासा, जि.अहिल्यानगर "** या ठिकाणी आयोजित करण्यात येत आहे.

## शिबिराची वैशिष्ट्ये

१) सदर शिबीर हे तीन दिवसाचे निवासी राहिल.
२) शिबीरार्थींना अल्पोपहार चहापान, भोजन आणि निवासव्यवस्था निशुल्क असेल.
३) सहभागी कामगारास प्रशिक्षण स्थळापर्यंत जाण्या-येण्याचा रेल्वे / एस.टी.ने कमीत कमी दराचा प्रवास खर्च आरक्षण शुल्कासह मंजूर करण्यात येईल.
४) भजनाची आवड असणारे व कामगार कल्याण निधी भरणारे कामगार कलावंत यांचाच यामध्ये सहभाग राहिल.
५) यापुर्वीच्या संपन्न झालेल्या १६ भजन प्रशिक्षण शिबीरात सहभागी झालेल्या कामगार कलावंताना या शिबिरात सहभाग घेता येणार नाही.

## • शिबिराच्या नियम व अटी •

१. शिबीरात सहभागी होणारे कलावंत हे महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ अंतर्गत मंडळाकडे कामगार कल्याण निधी भरणारे लीन नंबर धारक पुरुष / महिला कामगार कलावंत असावेत.

२. शिबीरार्थींना केंद्राचे सर्वसाधारण सभासद नोंदविणे आवश्यक आहे.

३. प्रत्येक गट कार्यालयाकडून विविध कारखाने / आस्थापनेचे कमाल ५ कामगार कलावंत सदर शिबीराकरीता पाठविण्यात यावे. ( प्रत्येक आस्थापनेतून एकाच कामगारची निवड करण्यात येईल ही यापूर्वीची अट संदर्भिय परिपत्रक क्र.१ अन्वये शिथिल करण्यात आलेली आहे.)

४. यापुर्वी सहभागी झालेल्या कारखाना / आस्थापनेतील कलावंतांना प्रवेश देण्यात येऊ नये. त्याऐवजी दुस-या कारखाना / आस्थापनेतील कलावंतांना प्रवेश देण्यात यावा.

५. शिबीराकरीता प्रशिक्षणार्थींची निवड करतांना ज्या कामगारास भजनाची आवड असून शिबीर संपल्यानंतर कारखाना / आस्थापना परिसरात किंवा तो वास्तव्य करीत असलेल्या ठिकाणी भजन संघ तयार करण्याची तयारी असेल अशाच कामगार कलावंताची निवड करावी.

६. शिबीरार्थींना अल्पोपहार, चहापान, भोजन आणि निवासव्यवस्था निशुल्क असेल व इतर आवश्यक असलेले साहित्य शिबीरार्थींनी स्वत: बरोबर आणावयाचे आहे. हे शिबीर पुर्णवेळ व निवासी असेल.

७. साखर कारखाने बंद असलेल्या कालावधीत पगार न झाल्यास, माहे जून ऐवजी डिसेंबर महिन्याची निधी कपात ग्राह्य धरली जाईल.

८. जे कामगार, मंडळाचा कामगार कल्याण निधी भरत होते परंतु काही अडचणीमुळे सेवानिवृत्ती, स्वेच्छानिवृत्ती स्विकारली आहे अशा कामगार व त्यांच्या कुटुंबियांना व सेवेत असताना मृत्यू झालेल्या कामगारांच्या कुटुंबियांना तसेच अडचणीमुळे बंद पडलेल्या उद्योगातील कामगार व त्यांच्या कुटुंबियांना कंपनी बंद पडलेल्या वर्षापासून तसेच सेवानिवृत्ती, स्वेच्छानिवृत्ती वा मृत्यू झाल्यापासून ३ वर्षे योजनेचा लाभ मिळेल या आधारे शिबिरासाठी (कार्यक्रम) फक्त एकदा प्रवेश मिळेल. त्यानुषंगाने संबंधित काळातील म.का.क. निधी भरल्याचा पुरावा जोडणे अनिवार्य आहे.

९. प्रवेश फी रु.२००/- भरणे आवश्यक आहे.

१०.अर्जदारने सोबत जोडलेला / मंडळाच्या वेबपोर्टलवर दिलेला प्रवेश अर्ज संपूर्ण माहितीसह तसेच सोबत प्रवेश शुल्क भरल्याची पावती, माहे डिसेंबर,२०२४ / जुन,२०२५ ची वेतनपावती, ओळखीचा पुरावा म्हणून कोणत्याही एका वैध ओळखपत्राची प्रत इत्यादी कागदपत्रांसह आपल्या जवळच्या ( निवासी किंवा कामाच्या ठिकाणच्या ) कामगार कल्याण केंद्रात सादर करावा. अर्ज सादर करण्याची मुदत दिनांक २७.१०.२०२५ पर्यंत राहील.

११.शिबीरात येतांना कामगाराने प्रवेश अर्जाची दुय्यम प्रत तसेच प्रवासाची तिकीटे (आरक्षणासह) सोबत आणावीत.

केंद्र कार्यालयाने आपल्याकडील प्राप्त प्रवेश अर्ज गट कार्यालयास त्वरित सादर करावे. गट प्रमुखांनी अर्जाची छाननी करून परिपूर्ण अर्जदारांची यादी विभागीय / गट कार्यालय,नाशिक व कार्यक्रम शाखा, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई येथे ई-मेल द्वारे त्वरित सादर करावी. तसेच प्राप्त प्रवेश अर्ज दिनांक ३०.१०.२०२५ पर्यंत विभागीय / गट कार्यालय,नाशिक येथे सादर करावेत.

**सोबत :- प्रवेश** अर्ज नमुना

( भास्कर मोरडे )
कल्याण आयुक्त

प्रत :-

१) उप कल्याण आयुक्त, लेखा व लेखा परीक्षा/कार्यक्रम/प्रशासन, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.

२) लेखा व लेखा परीक्षा अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.

३) सहाय्यक कल्याण आयुक्त, निधी वसूली/इमारत/भांडार/वाहन/संगणक, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.

४) प्रसिद्धी व जनसंपर्क अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.

५) विधी अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.

६) प्रशासन अधिकारी, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.

७) सहाय्यक कल्याण आयुक्त, विभागीय कार्यालय,मुंबई/ठाणे/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अकोला/नागपूर.

८) कल्याण आयुक्तांचे स्वीय सहाय्यक, मध्यवर्ती कार्यालय,मुंबई.

९) सहाय्यक लेखा अधिकारी, विभागीय कार्यालय,मुंबई/ठाणे/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अकोला/नागपूर.

१०)कामगार विकास अधिकारी, कामगार क्रीडा भवन,मुंबई/पुणे/नागपूर.

११)कामगार कल्याण अधिकारी, (सर्व गट कार्यालये) ###

१२)सर्व केंद्र प्रमुख.

### यांनी सदरचे परिपत्रक केंद्र प्रमुखांना उपलब्ध करून द्यावे.

# महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ

## १७ वे राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबीर

### श्री समर्थ सदगुरु किसनगिरी बाबा सेवकाश्रम, देवगड,
### ता.नेवासा, जि.अहिल्यानगर

---

## प्रवेश अर्ज

अर्जदारचा फोटो

प्रति,
मा,कल्याण आयुक्त.
महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ
हुतात्मा बाबू गेनू मुंबई गिरणी कामगार क्रीडा भवन,
सेनापती बापट मार्ग,
प्रभादेवी, मुंबई ४०००१३

महोदय,

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाने नाशिक विभागात " **श्री समर्थ सदगुरु किसनगिरी बाबा सेवकाश्रम, देवगड, ता.नेवासा, जि.अहिल्यानगर** " या ठिकाणी दिनांक १२ ते १४ नोव्हेंबर, २०२५ या कालावधीत आयोजित केलेल्या १७ व्या राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबीरामध्ये मी सहभागी होऊ इच्छित आहे. त्यासाठी सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | कामगाराचे संपूर्ण नाव | |
| २ | संपूर्ण पत्ता | |
| ३ | दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ४ | वय | |
| ५ | शैक्षणिक पात्रता | |
| ६ | कामगाराच्या आस्थापनेचे नाव, पत्ता, सदर आस्थापनेतील सेवाकाळ व कामगारांची संख्या | |
| ७ | कामगाराचा लिन ( LIN ) नंबर/नोंदणी क्रमांक (बांधकाम कामगार व सुरक्षारक्षक मंडळासाठी) | |
| ८ | केंद्राचे नाव | |
| ९ | सभासद क्रमांक व दिनांक | |

या शिबीरात मी सहभागी होऊन शिस्तीचे काटेकोर पालन करीन. या शिबीरात बहुमोल मार्गदर्शन तथा ज्ञान आत्मसात करीन. या ज्ञानाचा वापर माझ्या व्यवस्थापनातील अन्य सहका-यांना आणि सभोवतालच्या माझ्या समाजाकरीता करण्याची मी हमी देतो/देते.

शिबीरार्थीची सही

**कार्यालयीन वापराकरीता**

श्री/श्रीमती ------------------------------------------ यांना शिबीरात प्रवेश देण्यात यावा. त्यांचा सभासद क्र.---------- दि. / /२० केंद्राचे नाव ------------------------------------ प्रवेश फी रु. पावती क्र.--------- दि.

| | | |
|---|---|---|
| केंद्रप्रमुख | | कामगार कल्याण अधिकारी |
| का.क.केंद्र, | सही व शिक्का | गट कार्यालय, |

---

**सोबत :-** प्रवेश शुल्क भरणा पावती, ओळखीचा पुरावा म्हणून कोणत्याही एक वैध ओळखपत्राची प्रत, कामगाराची माहे जून / डिसेंबर वेतन पावती, बांधकाम सुरक्षारक्षक मंडळ कामगाराने नोंदणी प्रमाणपत्र जोडावे.